**महादेव विरुध्द ज्ञानोबा व इतर**

## <u>निशाणी क्र. ३८ खाली आदेश</u>

प्रस्तुतचे अर्ज प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या विरुध्द झालेला विना लेखी जबाबाचा आदेश रद्द करुन त्यांना लेखी जबाब स्वीकारण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. ३ व ४ चे असे कथन आहे की, प्रतिवादी हे हजर झाल्यानंतर मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल करु न शकल्यामुळे दिनांक ०६.१२.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. ४ विरुध्द व दिनांक १७.०८.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. ३ विरुध्द विना लेखी जबाब आदेश पारित केलेला आहे. सदरचा झालेला विलंब हा प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक केलेला नसुन केवळ प्रतिवादी यांना काही महत्वाची कागदपत्रे हस्तगत होऊ न शकल्यामुळे झाला आहे. सदरचा आदेश रद्द झाला नाही व प्रतिवादी यांचा लेखी जबाब दाखल झाला नाही तर प्रतिवादी यांचे दाव्यात कधीही न भरुण येणारे नुकसान होईल व प्रकरणात न्यायीक दृष्टीकोनातुन निकाल लागणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या विरुध्द पारीत झालेला विना लेखी जबाबाचा आदेश रद्दकरुन त्यांना लेखी जबाब अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** वादीचे वकील श्री. एस.आर.चौरे यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन कथन केले की, प्रतिवादींनी हेतुपुरस्पर त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्यास विलंब केलेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक नाही. सबब प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**०४.** प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी यांनी प्रस्तुतच्या अर्जामध्ये त्यांना काही महत्वाची कागदपत्रे हस्तगत होऊ न शकल्यामुळे झाला आहे. सदरचा आदेश रद्द झाला नाही व प्रतिवादी यांचा लेखी जबाब दाखल करु शकले नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना दाव्यातील समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. ४ हा दिनांक २०.१०.२०२३ रोजी व प्रतिवादी क्र. ३ तिच्या विधीज्ञांमार्फत दिनांक ०१.०४.२०२४

रोजी प्रकरणात हजर होऊन मुदतीत लेखी जबाब अभिलेखावर दाखल केला नसल्याने प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दिनांक १७.०८.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दिनांक ०६.१२.२०२४ रोजी विरुध्द विना लेखी जबाबाचा आदेश पारित करण्यात आला.

**०५**. सदर प्रकरणातील अभिलेख तपासले असता असे दिसुन येते की, सदरचा दावा हा सन २०२१ मध्ये दाखल करण्यात आलेला असुन प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दिनांक १७.०८.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दिनांक ०६.१२.२०२४ रोजी विना लेखी जवाबाचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी जवाब आदेश रद्द करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. तसेच आज रोजी प्रतिवादी क्र. ३ व ४ हे लेखी जवाब अभिलेखावर दाखल करण्यास तयार आहे. सदरचा दावा हा वादीने दावा मिळकतीचा ताबा मिळण्याकरीता तसेच मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केलेला असुन नैसर्गीक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही बाजु ऐकुण घेतल्यानंतर दावाचा निकाल देणे संयुक्तीक ठरेल त्याकरीता प्रतिवादी यालार अभिलेखावर आपले म्हणणे मांडु देण्याची एक संधी निश्चीतच देणे गरजेचे आहे. परंतु झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीवर आर्थीक स्वरुपात दंड लावणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश.

**१**. अर्ज नि.क्र. ३८ रुपये ३००/– प्रत्येकी खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**२**. प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दिनांक १७.०८.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र. ४ विरुध्द दिनांक ०६.१२.२०२४ याच्या विरुध्द दिनांक १९.०७.२०२४ रोजी पारीत करण्यात आलेला विना लेखी जवाबाचा आदेश हा रद्द ठरविण्यात येतो व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना लेखी जवाब दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो व प्रस्तुत

दाव्यात लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

**३**. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर वरील आदेश अंमलात येतील व त्यांना त्याचा लेखी जवाब दाखल करता येईल.

MANDAR MOHAN RAUT

Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2024.11.22 17:46:33 +0530

दिनांक २२.११.२०२४.

(**मंदार मो. राऊत**)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सेलू जि. परभणी